EQUIFAX

sidbi



# मायक्रोफायनान्स पल्स

अंक 11 - जानेवारी 2022

# वैश्लेषिक संपर्क

## इक्विफॅक्स

किरण समुद्रला
उपाध्यक्ष वैश्लेषिक
kiran.samudrala@equifax.com

श्रुती जोशी
सहाय्यक उपाध्यक्षा - वैश्लेषिक
shruti.joshi@equifax.com

वंदना पांचाळ
वरिष्ठ कार्यकारी - वैश्लेषिक
vandana.panchal@equifax.com

## सिडबी

चंद्र शेखर थान्वी
मुख्य महाव्यवस्थापक एमपीआयवी-ईआरडीए
erdav@sidbi.in

रंगदास प्रभावती
उप महाव्यवस्थापक - एमपीआयवी - ईआरडीए
erdav@sidbi.in

रमेश कुमार
व्यवस्थापक एमपीआयवी - ईआरडीए
rameshk@sidbi.in

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| कार्यकारी सारांश | 04 |
| संक्षेप आणि शब्दावली | 05 |
| सूक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन | 06 |
| वितरणाचे कल | 09 |
| उद्योग जोखमीची रूपरेखा | 12 |
| भौगोलीक व्याप्ती | 14 |
| सर्वसमावेशक राज्य रूपरेखा :मध्य प्रदेश | 17 |
| महत्वाकांक्षी जिल्हे | 22 |
| सूक्ष्मवित्त उद्योगाची वर्षगतवर्ष तुलनात्मक कामगिरी | 24 |

# कार्यकारी सारांश

एमएफआय पल्सच्या या 11 व्या आवृत्तीत 30 सप्टेंबर 2021 पर्यंतच्या डेटा संकलनावर आधारित आशुचित्र आणि सूक्ष्मवित्त उद्योगाचा या तारखेपर्यन्तच्या प्रगतीचा समावेश आहे.

सूक्ष्मवित्त उद्योगाची 30 सप्टेंबर 2021 पर्यंतची पोर्टफोलिओ शिल्लकबाकी ₹ 2,26,123 कोटी आहे. बँका, लघुवित्त बँका आणि एनबीएफसी-एमएफआय चे पोर्टफोलिओ शिल्लकबाकीमधे एकत्रित योगदान 90% पेक्षा जास्त आहे तर वितरणामधे 95% योगदान आहे. सूक्ष्मवित्त उद्योगामधे जून 2021 ते सप्टेंबर 2021 या काळात तिमाही-गत-तिमाही दरांत 2% ची वृद्धी झाली. एनबीएफसी-एमएफआय ची सप्टेंबर 2020 ते सप्टेंबर 2021 या काळातील वर्षगतवर्ष तुलनात्मक 14% वाढ आणि जून 2021 ते सप्टेंबर 2021 या काळातील 10% तिमाही-गत-तिमाही वाढ ह्या सर्वात जास्त होत. जून 2021 च्या तुलनेत सप्टेंबर 2021 मधे बँकांची पोर्टफोलिओ शिल्लकबाकी 3% ने कमी झाली.

जूऑस '20 ते जूऑस '21 या काळात कर्ज वितरण संखेत 94% तर मूल्यानुसार कर्ज वितरणात 96% वाढ झाली. सर्व तिमाही मधे ₹30K - 40K या सरासरी तिकीट आकारातील कर्जवितरण संख्या सर्वात जास्त होती. जूऑस '20 ते जूऑस '21 मधे सरासरी तिकीट आकारमानात 1% नी वाढ झाली.

जून 2021 च्या तुलनेत सप्टेंबर 2021 मधे कसूर दारांच्या सर्व श्रेणीत घट झाली. जून 2021 तिमाही खेरीज, इतर सर्व तिमाही मध्ये 60-89 दिवसांचा कसूर दर न्यूनतम होता.

तमिळ नाडू राज्य ₹29,335 कोटी पोर्टफोलिओ शिल्लकबाकीसह आघाडीवर असून त्याचा एकूण पोर्टफोलिओ शिल्लकबाकी मधे 13% वाटा आहे. 30 सप्टेंबर 2021 रोजी तामिळ नाडू, पश्चिम बंगाल, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश ही 5 शीर्षस्थ राज्ये आहेत. या 5 शीर्षस्थ राज्या मधे, पश्चिम बंगालचा 90+ कसूर दर सूक्ष्मउद्योगक्षेत्राच्या एकूण कसूर दरापेक्षा पेक्षा जास्त आहे.

या आवृत्तीत मध्य प्रदेश राज्याची सर्वसमावेशक रूपरेखा समाविष्ट आहे. मध्य प्रदेशची 30 सप्टेंबर 2021 पर्यंत पोर्टफोलिओ शिल्लकबाकी ₹13,920 कोटी आहे. पोर्टफोलिओ शिल्लकबाकीमधे सर्वात जास्त सहभाग एनबीएफसी-एमएफआय आणि त्यानंतर बँकांचा आहे. जूऑस 21 दरम्यान मध्य प्रदेशातील कर्ज वितरीत रक्कम ₹ 4,340 कोटी आहे. एनबीएफसी आणि बँकांचा सरासरी तिकीट आकारमान दर हा राज्याच्या एकूण सरासरी तिकीट आकारमान दरापेक्षा जास्त आहे. मध्य प्रदेश राज्याचा 90+ कसूर दर सूक्ष्मवित्त उद्योगाच्या एकूण कसूरदरापेक्षा जास्त आहे.

या अहवालामधे सूक्ष्मवित्त उद्योगाच्या वर्षगतवर्ष वाढीच विश्लेषण सादर केल आहे. मार्च 2020 पासून देशव्यापी लॉकडाऊनमुळे सूक्ष्मवित्त उद्योगात मंदी आली. ऑक्टोबर 2018 ते सप्टेंबर 2019 या कालावधीच्या तुलनेत, ऑक्टोबर 2019 ते सप्टेंबर 2020 या कालावधीत कर्जाच्या मागणीमध्ये संख्या आणि मूल्याच्या संदर्भात अनुक्रमे 28% आणि 24% ने घट झाली. तथापि, सूक्ष्मवित्त उद्योगाच्या परीचालनात पुनः वाढ होत असून ऑक्टोबर 2020 ते सप्टेंबर 2021 या कालावधीत संख्या आणि मूल्याच्या संदर्भात अनुक्रमे 35% आणि 37% ने वाढ झाली आहे.

# संक्षेप व शब्दावली

- ATS एटिस (सरासरी तिकीट आकार) = वितरित कर्ज रक्कम / कर्जांची संख्या
- DPD डीपीडी = परतावा दिनांक उलटल्यानंतरचे दिवस
- सदयकालीन शिल्लकबाकी पोर्टफोलियो किंवा उधारकर्ता किंवा सक्रीय कर्ज = 0 ते 179 डीपीडी + नवी खाती + वर्तमान खाती
- MFI एमएफआय = मायक्रोफायनान्स संस्था
- POS पीओएस = शिल्लकबाकी पोर्टफोलियो
- UT यूटी = केंद्रशासित प्रदेश
- AD महत्वाकांक्षी जिल्हे (एडी) - आरोग्य व आहार, शिक्षण, कृषी आणि जलस्त्रोत, वित्तीय समावेश, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांसारख्या संयुक्त निर्देशकांच्या दृष्टीने मानव विकासांक वृद्दीच्या सुधारणेसाठी जानेवारी 2018 मध्ये नीती आयोग, भारत सरकारने निश्चित केलेले जिल्हे (सध्या संख्येने 117).

- 1-179 = 1 to 179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 1-29 = 1 to 29 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 30-59 = 30 to 59 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 60-89 = 60 to 89 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 90-179 = 90 to 179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 30+ कसूर = 30-179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस
- 90+ कसूर = 90-179 डीपीडी/ सदयकालीन पीओएस

- JAS'20 जुऑस'20 = जुलै 2020 ते सप्टेंबर 2020
- OND'20 ऑनोडि'20 = ऑक्टोबर 2020 ते डिसेंबर 2020
- JFM'21 जाफेमा'21 = जानेवारी 2021 ते मार्च 2021
- AMJ'21 एमेजू' 21 = एप्रिल 2021 ते जून 2021
- JAS'21 जुऑस 21 = जुलै 2021 ते सप्टेंबर 2021

EQUIFAX

sidbi




# सूक्ष्मवित्त उद्योग अवलोकन

# सूक्ष्मवित्त उद्योगाचे आशुचित्र

## यथा 30 सप्टेंबर 2021

| आशुचित्र 30th September 2021 | BANKS | SFBs | NBFC-MFIs | NBFCs | Not for profit MFIs | Total Industry |
|---|---|---|---|---|---|---|
| अनन्य सक्रिय ऋणको (000) | 24,779 | 12,280 | 23,348 | 6,538 | 785 | 67,730 |
| सक्रिय कर्ज ('000) | 36,981 | 15,411 | 36,059 | 7,161 | 1,030 | 96,642 |
| पोर्टफोलियो (₹करोड) | 92,725 | 36,863 | 79,932 | 14,621 | 1,982 | 226,123 |
| वितरितरक्कम | | | | | | |
| सरासरी तिकीट आकार (₹)जूऑस '21 | 35,609 | 34,023 | 34,617 | 41,027 | 28,285 | 35,085 |




- 30 सप्टेंबर 2021 पर्यंत सूक्ष्मवित्त उद्योगाची पोर्टफोलिओ शिल्लकबाकी ₹ 2,26,123 कोटी होती
- पोर्टफोलियो शिल्लकबाकी मधे बँका, लघुवित्त बँका आणि एनबीएफसी-एमएफआय चे योगदान 90% पेक्षा जास्त आणि जूऑस '21 तिमाहीतील वितरणामधे 95% योगदान आहे.
- बँका आणि एनबीएफसीचे एटीएस (कर्जाचा सरासरी तिकीट आकार) सूक्ष्मवित्तउद्योगाच्या एकूण एटीएस पेक्षा जास्त आहे.
- एनबीएफसी-एमएफआय, एनबीएफसी आणि ना-नफा एमएफआय चे 30+ आणि 90+ कसूर दर उद्योगाच्या एकूण कसूर दाराच्या तुलनेत कमी आहेत.


टीप: एमएफआय विभागात 6 करोड अनन्य सक्रिय कर्जदार आहेत. ग्राहकांचा एसएफबी, बँका, एनबीएफसी-एमएफआय, एनबीएफसी आणि ना-नफा एमएफआई बरोबर असणाऱ्या बहुविध संबंधामुळे ग्राहकांच्या अनन्य संख्येत फरक आहे.

# सूक्ष्मवित्त उद्योगाचे अवलोकन

पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड )

| तपशील | Sep' 20 | Dec' 20 | Mar' 21 | Jun' 21 | Sep' 21 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 93,409 | 96,683 | 109,867 | 95,674 | 92,725 |
| लघुवित्त बँक | 42,682 | 38,109 | 38,903 | 35,345 | 36,863 |
| एनबीएफसी-एमएफआय | 70,142 | 73,166 | 79,420 | 72,856 | 79,932 |
| एनबीएफसी | 19,838 | 18,988 | 18,992 | 16,140 | 14,621 |
| ना-नफा एमएफआय | 1,772 | 1,872 | 2,095 | 2,045 | 1,982 |
| एकूण उद्योग | 227,843 | 228,818 | 249,277 | 222,060 | 226,123 |
| तिमाही-दर-तिमाही वृद्धी दर % | - | 0% | 9% | -11% | 2% |

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशचा कल




- जून 2021 ते सप्टेंबर 2021 या काळात सूक्ष्मवित्त उद्योगात तिमाही-दर-तिमाही 2% दरानी वाढ झाली.
- एनबीएफसी-एमएफआयचा सप्टेंबर 2020 ते सप्टेंबर 2021 या काळातील वर्षगतवर्ष वाढीचा दर सर्वात जास्त 14% तर जून 2021 ते सप्टेंबर 2021 मधे तिमाही-दर-तिमाही वाढीचा दर 10% होता.
- जून 2021 च्या तुलनेत सप्टेंबर 2021 मधे बँकांची पोर्टफोलियो शिल्लकबाकी 3% नी कमी झाली.




# वितरणाचे कल

# वितरणाचे कल - संस्था निहाय

वितरीत कर्ज संख्या (लक्ष)

| कर्जदाता प्रकार | JAS' 20 | OND' 20 | JFM' 21 | AMJ' 21 | JAS'21 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 46 | 101 | 111 | 42 | 77 |
| लघुवित्त बँका | 12 | 20 | 31 | 9 | 35 |
| एनबीएफसी-एमएफआय | 32 | 65 | 78 | 19 | 69 |
| एनबीएफसी | 6 | 8 | 13 | 3 | 7 |
| ना-नफा एमएफआय | 2 | 2 | 3 | 1 | 2 |
| एकूण उद्योग | 98 | 196 | 236 | 74 | 190 |

कर्जदाता प्रकारानुसार बाजारांशचा कल





- जूऑस 20 च्या तुलनेत जूऑस 21 मधे वितरण संख्येत 94% तर मूल्यामधे 96% ने वाढ झाली.
- सर्व तिमाही मध्ये बँका आणि एनबीएफसी-एमएफआय यांनी सर्वात जास्त कर्ज वितरीत केल.
- लघुवित्त बँकांचे जूऑस 20 ते जूऑस 21 या काळात कर्ज वितरण संख्या आणि मूल्य दोन्ही मधे सर्वोच्च वाढ होती.

# उद्योग तिकीट आकार - कल

वितरीत कर्ज संख्या (लक्ष)

| तिकीट आकार | JAS' 20 | OND' 20 | JFM' 21 | AMJ' 21 | JAS' 21 | Y-o-Y Growth Rate |
|---|---|---|---|---|---|---|
| 0k-10k | 4 | 35 | 19 | 8 | 18 | 350% |
| 10k-20k | 16 | 20 | 19 | 8 | 20 | 25% |
| 20k-30k | 18 | 32 | 40 | 12 | 33 | 83% |
| 30k-40k | 24 | 44 | 60 | 17 | 47 | 96% |
| 40k-50k | 18 | 29 | 39 | 11 | 29 | 61% |
| 50k-60k | 10 | 18 | 27 | 9 | 24 | 140% |
| 60k Plus | 8 | 18 | 32 | 9 | 19 | 138% |
| एकूण | 98 | 196 | 236 | 74 | 190 | 94% |
| तिमाही-दर-तिमाही कर्ज वितरणातील वाढ % | - | 100% | 20% | -69% | 157% | - |
| संपूर्ण भारताचा एटीएस (₹) | 34,724 | 32,174 | 38,792 | 35,781 | 35,085 | - |




- सर्व तिमाही मध्ये सर्वात जास्त कर्ज 30K-40K या तिकीट आकारात दिली.
- 40% कर्ज 30K-50K या तिकीट आकारात दिली.
- जूऑस 20 ते जूऑस 21 या काळात सरासरी तिकीट आकारात 1% नी वाढ झाली.


EQUIFAX sidbi




# उद्योग जोखमीची रूपरेखा

# कसूर दराचा कल

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sep' 20 | 15.35% | 3.47% | 0.39% | 0.63% | 19.84% |
| Dec' 20 | 7.50% | 4.73% | 3.49% | 4.96% | 20.68% |
| Mar' 21 | 4.55% | 2.90% | 2.01% | 4.12% | 13.58% |
| Jun' 21 | 14.90% | 10.14% | 3.38% | 3.01% | 31.43% |
| Sep' 21 | 8.64% | 5.44% | 1.74% | 2.95% | 18.77% |





- जून 2021च्या तुलनेत सप्टेंबर 2021 मधे सर्व कसूर दर गटात घट दिसून आली.
- जून 2021 तिमाही व्यतिरिक्त इतर तिमाही मधे 60-89 डीपिडी गटांत कसूर दर सर्वात कमी होता.



# भौगोलिक व्याप्ती

# पोर्टफोलियो शिल्लकबाकी: राज्य/कें.शा.प्रदेशानुसार


## यथा 30 सप्टेंबर 2021




- ❒ एकूण पोर्टफोलियो शिल्लकबाकीमधे 82% पेक्षा जास्त योगदान शीर्ष 10 राज्यांचे आहे
- ❒ तमिळ नाडू, ₹ 29,335 करोड पोर्टफोलियो शिल्लकबाकीसह अग्रेसर असून एकूण पोर्टफोलियो मधे राज्याचे 13% योगदान आहे.
- ❒ तमिळ नाडू, पश्चिम बंगाल, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश ही 30 सप्टेंबर 2021 ची 5 शीर्षस्थ राज्ये आहेत.

# राज्य/कें.शा.प्रदेशानुसार 90+ कसूर
## यथा 30 सप्टेंबर 2021

**एकत्रित 90+ कसूर दर**
**2.95%**




This Map is a generalized illustration only and is not intended to be used for reference purpose.
Note: This graph is based on the data/information submitted by institutions as of 30th September 2021

- ❒ पश्चिम बंगालचा 90+ कसूर दर एकूण उद्योगाच्या कसूर दरापेक्षा जास्त आहे
- ❒ तमिळ नाडू, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश यांचा 90+ कसूर दर एकूण उद्योगाच्या कसूर दरापेक्षा कमी आहे

EQUIFAX

sidbi




# सर्वसमावेशक राज्य रूपरेखा: मध्य प्रदेश

# राज्य दृष्टीक्षेप : मध्य प्रदेश

| दृष्टीक्षेप मध्य प्रदेश यथा 30th सप्टेंबर 2021 | Banks | SFBs | NBFC - MFIs | NBFCs | Not for Profit MFIs | Industry |
|---|---|---|---|---|---|---|
| सक्रिय कर्जे ('000) | 1,858 | 919 | 2,800 | 408 | 51 | 6,036 |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकीचा बाजारांश | 31% | 16% | 47% | 6% | 1% | - |
| सरासरी तिकीट आकार (₹)-जूऑस 21 | 36,006 | 33,629 | 34,638 | 41,499 | 24,795 | 34,938 |
| 30+ कसूर (POS) | 12.34% | 9.27% | 8.38% | 11.70% | 2.15% | 9.88% |
| 90+ कसूर (POS) | 3.92% | 3.56% | 2.53% | 4.44% | 0.78% | 3.22% |

सक्रिय कर्जे ('000) | पोर्टफोलियो (₹करोड) | वितरीत रक्कम (₹करोड) - जूऑस 21





- मध्य प्रदेशची 30 जून 2021 ची पोर्टफोलियो शिल्लकबाकी ₹ 13,920 करोड आहे
- पोर्टफोलियो शिल्लकबाकीमधे सर्वाधिक सहभाग एनबीएफसी-एमएफआय आणि त्यानंतर बँका यांचा आहे
- जूऑस 21 दरम्यान मध्य प्रदेश मधे ₹4,340 करोड चे कर्ज वितरीत झाले.
- राज्याच्या एकूण सरासरी तिकीट आकारमानाच्या तुलनेत, एनबीएफसी आणि बँकांची एटीएस जास्त आहे.
- मध्य प्रदेश चा 90+ कसूर दर सूक्ष्मवित्त उद्योगाच्या एकूण कसूर दरापेक्षा जास्त आहे
- ना-नफा एमएफआय आणि एनबीएफसी-एमएफआय चा 90+ कसूर दर मध्य प्रदेश मधील सर्व कर्ज दात्यांमधे सर्वात कमी आहे.

# मध्य प्रदेश : सरासरी तिकीट आकाराचा कल

**सरासरी तिकीट आकाराचा कल**


| तिकीट आकार | JAS' 20 | OND' 20 | JFM' 21 | AMJ' 21 | JAS' 21 | Y-o-Y Growth Rate |
|---|---|---|---|---|---|---|
| 10k-20k | 81 | 77 | 108 | 32 | 113 | 40% |
| 0k-10k | 22 | 124 | 106 | 39 | 99 | 350% |
| 30k-40k | 171 | 328 | 427 | 83 | 332 | 94% |
| 20k-30k | 125 | 192 | 245 | 52 | 234 | 87% |
| 50k-60k | 80 | 160 | 185 | 41 | 162 | 103% |
| 40k-50k | 122 | 196 | 270 | 51 | 193 | 58% |
| एकूण | 652 | 1,190 | 1,512 | 331 | 1,240 | 90% |
| 60k Plus | 51 | 113 | 171 | 33 | 107 | 110% |
| तिमाही-दर-तिमाही वितरण वाढीचा दर % | - | 83% | 27% | -78% | 275% | - |
| मध्य प्रदेश ए टी एस (₹) | 35,123 | 35,410 | 37,498 | 34,747 | 34,938 | - |
| तिमाही-दर-तिमाही एटीएस वाढीचा दर % | - | 1% | 6% | -7% | 1% | - |




- जूऑस 20 ते जूऑस 21 या काळात वर्षगतवर्ष तुलनेत मध्य प्रदेश च्या वितरण संख्येत 90% वाढ दिसून आली.
- 60% पेक्षा जास्त वितरण हे 20k-50k तिकीट आकारमान गटात आहेत.
- एमेजू 21 ते जूऑस 21 मधे मध्य प्रदेशची एटीएस 1% नी वाढली.

# मध्य प्रदेश: पोर्टफोलियो शिल्लकबाकीचा कल


| तपशील | Sep' 20 | Dec' 20 | Mar' 21 | Jun' 21 | Sep' 21 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 4,181 | 4,358 | 5,052 | 4,291 | 4,277 |
| लघुवित्त बँका | 2,193 | 2,115 | 2,226 | 2,012 | 2,236 |
| एनबीएफसी-एमएफआय | 5,381 | 5,853 | 6,552 | 5,920 | 6,552 |
| एनबीएफसी | 1,164 | 1,167 | 1,093 | 861 | 766 |
| ना-नफा एमएफआय | 66 | 74 | 83 | 84 | 89 |
| मध्य प्रदेश | 12,985 | 13,567 | 15,006 | 13,168 | 13,920 |
| तिमाही-दर-तिमाही वाढ दर | - | 4% | 11% | -12% | 6% |




- सप्टेंबर 2020 ते सप्टेंबर 2021 या काळात मध्य प्रदेशच्या पोर्टफोलियो शिल्लकबाकीमध्ये वर्षगतवर्ष तुलनेत 7% ची वाढ आहे.
- सर्व तिमाहीत पोर्टफोलियो शिल्लकबाकीमध्ये एनबीएफसी-एमएफआय आणि बँका यांचा सहभाग 70% पेक्षा जास्त आहे.

# मध्य प्रदेश : 90+ कसूर दराचे कल

| कर्जदाता प्रकार | Sep' 20 | Dec' 20 | Mar' 21 | Jun' 21 | Sep' 21 |
|---|---|---|---|---|---|
| बँका | 0.42% | 4.25% | 3.10% | 2.50% | 3.92% |
| लघु वित्त बँका | 0.20% | 4.16% | 3.26% | 2.07% | 3.56% |
| एनबीएफसी-एमएफआय | 0.95% | 5.67% | 2.56% | 3.51% | 2.53% |
| एनबीएफसी | 0.92% | 3.01% | 7.24% | 3.24% | 4.44% |
| ना-नफा एमएफआय | 1.04% | 2.44% | 1.68% | 1.06% | 0.78% |




- मध्य प्रदेशचा 90+ कसूर दर जून 2021 मधील 2.93% च्या तुलनेत सप्टेंबर 2021 मधे वाढून 3.22% झाला.
- मार्च 2021 पासून सप्टेंबर 2021 पर्यन्त ना-नफा एमएफआय च्या 90+ कसूर दर कलात उतरण दिसते.

**Note** : Delinquencies calculated basis POS


EQUIFAX


sidbi



# महत्वाकांक्षी जिल्हे

# महत्वाकांक्षी जिल्हे सप्टेंबर 2021 दृष्टीक्षेप




| महत्वाकांक्षी जिल्हे | December 2017 | September 2021 | Growth % |
|---|---|---|---|
| सक्रिय कर्जदार उत्पत्ती ('000) | 4,155 | 8,440 | 103% |
| वितरीत रक्कम (₹ करोड) | 14,374 * | 34,595** | 141% |
| सक्रिय कर्ज ('000) | 6,925 | 13,203 | 91% |
| पोर्टफोलियो शिल्लकबाकी (₹ करोड) | 11,175 | 29,975 | 168% |
| 30+ कसूर दर | 1.54% | 7.47% | - |
| 90+ कसूर दर | 0.75% | 2.28% | - |

- 30 सप्टेंबर 2021 पर्यन्त महत्वाकांक्षी जिल्ह्यांची पोर्टफोलियो शिल्लकबाकी ₹29,975 करोड असून डिसेंबर 2017 च्या तुलनेत 168% वाढ झाली.
- महत्वाकांक्षी जिल्ह्यांत ऑक्टोबर 2020 ते सप्टेंबर 2021 मधे ₹34,595 करोड कर्ज वितरीत झाल.
- बँकां आणि लघुवित्त बँकांचा 30+ आणि 90+ कसूर दर हा महत्वाकांक्षी जिल्ह्यांच्या एकण 30+ व 90+ कसूर दरापेक्षा जास्त आहे.

Note : *Disbursement January 2017 to December 2017
** Disbursement October 2020 to September 2021
Delinquencies are calculated basis POS





# सूक्ष्मवित्त उद्योग वर्षगतवर्ष तुलनात्मक कामगिरी


# वितरणातील वर्षगतवर्ष तूलनात्मक वाढ

कोविड महामारी आणि वाहतूक निर्बंधांचा सूक्ष्मवित्त उद्योगावर विपरित परिणाम झाला आहे. कोविड-19 चा सूक्ष्मवित्त उद्योगावरील प्रभावाचे विश्लेषण करण्यासाठी, गेल्या 3 वर्षातील कर्जदाता प्रकार आणि राज्यवार कल यानुसार कर्ज उत्पत्ती , पोर्टफोलिओ शिल्लकबाकी आणि कसूर संदर्भात विश्लेषण करण्यात आले.

**वितरीत कर्ज संख्या (लक्ष)**






**वितरीत रक्कम (₹ करोड)**




- मार्च 2020 पासून देशव्यापी लॉकडाऊनमुळे सूक्ष्मवित्त उद्योगात मंदी आली. ऑक्टोबर 2018 ते सप्टेंबर 2019 या कालावधीच्या तुलनेत, ऑक्टोबर 2019 ते सप्टेंबर 2020 या कालावधीत कर्जाच्या मागणीमध्ये संख्या आणि मूल्याच्या संदर्भात अनुक्रमे 28% आणि 24% ने घट झाली. तथापि, सूक्ष्मवित्त उद्योगाच्या परीचालनात पुनः वाढ होत असून ऑक्टोबर 2020 ते सप्टेंबर 2021 या कालावधीत संख्या आणि मूल्याच्या संदर्भात अनुक्रमे 35% आणि 37% ने वाढ झाली आहे.
- सर्व कर्जदातापैकी एनबीएफसी ला महामारीच्या काळात जबरदस्त फटका बसला. ऑक्टोबर 2018 ते सप्टेंबर 2019 च्या तुलनेत ऑक्टोबर 2019 ते सप्टेंबर 2020 या कालावधीत त्यांचे कर्ज वितरण, संख्या आणि मूल्य हे अनुक्रमे 40% व 39% पर्यंत खाली आले

# पोर्टफोलियो शिल्लकबाकीची वर्षगतवर्ष वाढ आणि 90+ कसूर दराचे स्थित्यंतर








- सप्टेंबर 2019 ते सप्टेंबर 2021 या काळात एनबीएफसी आणि ना-नफा एमएफआय या शिवाय इतर सर्व कर्जदात्यांमधे सकारात्मक वाढ दिसली.
- सप्टेंबर 2020 ते सप्टेंबर 2021या काळात फक्त एनबीएफसी-एमएफआय मधे वर्षगतवर्ष सकारात्मक वाढ दिसली.
- बँकांचा 90+ कसूर दर सप्टेंबर 2019 मधे सर्वात कमी होता तर सप्टेंबर 2021 ला सर्व कर्जदात्यामधे सर्वात जास्त होता.
- सप्टेंबर 2021मधे सर्व कर्जदात्यांच्या 90+ कसूर दरा मधे, सप्टेंबर 2019 आणि सप्टेंबर 2020 च्या तुलनेत वाढ दिसून आली.

# शीर्षस्थ 10 राज्यांच्या पोर्टफोलियो शिल्लकबाकीची वर्षगतवर्ष वाढ

| शीर्षस्थ 10 राज्य | Sep' 19 (POS ` crore) | Position 2019 | Sep' 20 (POS ` crore) | Position 2020 | Sep' 21 (POS ` crore) | Position 2021 |
|---|---|---|---|---|---|---|
| तमिळ नाडू | 29,383 | 1 | 33,708 | 1 | 29,335 | 1 |
| पश्चिम बंगाल | 28,661 | 2 | 33,560 | 2 | 27,932 | 2 |
| बिहार | 20,938 | 3 | 24,838 | 3 | 26,791 | 3 |
| कर्नाटक | 17,244 | 4 | 17,982 | 4 | 19,566 | 4 |
| महाराष्ट्र | 13,742 | 5 | 16,717 | 5 | 16,276 | 6 ↓ |
| आसाम | 12,508 | 6 | 11,805 | 9 ↓ | 7,007 | 10 ↓ |
| उत्तर प्रदेश | 12,334 | 7 | 14,397 | 6 | 17,898 | 5 |
| ओडिशा | 11,213 | 8 | 12,557 | 8 | 13,882 | 8 |
| मध्य प्रदेश | 11,213 | 9 | 12,985 | 7 | 13,920 | 7 ↑ |
| केरळ | 8,042 | 10 | 9,271 | 10 | 9,302 | 9 |

शीर्षस्थ 10 राज्यांच्या 90+कसूर ची स्थित्यंतरे




- तमिळनाडू, पश्चिम बंगाल, बिहार, कर्नाटक आणि ओडिशा यांनी आपलं स्थान राखल आहे.
- आसाम आपल्या सप्टेंबर 2019 मधील 6 व्या जागेवरून सप्टेंबर 2020 मधे 9 व्या स्थानावर तर सप्टेंबर 2021 मधे 10 व्या स्थानावर आल.
- मध्य प्रदेश सप्टेंबर 2019 नंतर, सप्टेंबर 2020 मधे 7 व्या स्थानावर गेल आणि सप्टेंबर 2021 मधे त्याच स्थानावर आहे.
- सप्टेंबर 2019 च्या तुलनेत सर्व शीर्षस्थ राज्यांचा 90+ कसूर दरात सप्टेंबर 2021 मधे वाढ झाली आहे

**Note :** Top 10 States identified basis September 2019 POS
90+ delinquency for September 2020 and September 2021 is compared with September 2019.
If 90+ delinquency is higher than the September 2019 then the state is colored in Red otherwise Green.

## सिडबी बद्दल

भारतीय लघुउद्योग विकास बँकेची (सिडबी) स्थापना 1990 साली संसदेच्या अधिनियमनामान्वये झाली. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगक्षेत्राच्या (एमएसइ) प्रोत्साहन, वित्तपुरवठा आणि विकासाची तिहेरी कार्यावली अमलात आणण्यासाठी आणि तत्सम कार्ये करणाऱ्या संस्थांमध्ये समन्वय साधण्यासाठी सिडबीला प्रमुख वित्तीय संस्था म्हणून कार्य करण्यासाठी अधिकृत केलेले आहे. इतक्या वर्षांमध्ये तिच्या विविध वित्तीय आणि विकासाच्या उपायांद्वारे बँकेने समाजाच्या विविध स्तरांतील लोकांच्या जीवनात स्थान मिळविले आहेतिने एमएसएमइ . च्या समग्र वर्णपटातील उपक्रमांवर प्रभाव टाकला आहे आणि एमएसएमइच्या परिसंस्थेतील अनेक विश्वासार्ह संस्थांशी सलग्न झाली आहे.

व्हिजन 2.0 अंतर्गत सिडबीने एमएसएमइ विभागाच्या माहीतीची विषमता संबोधित करताना एमएसएमइ पल्स, एमएसएमइ चे आणि क्रिसायडेक्सचे हेल्थ ट्रॅकर, एमएसइ भावना व आकांक्षांचे मापन, इंडस्ट्री स्पॉटलाइट आणि उद्योगक्षेत्रांवर एक सर्वकष अहवाल आणि फिंटेक पल्स, मायक्रोफायनान्स पल्स शिवाय फिंटेक लेंडिंग विभागावरील क्रेडीट डेटा अंतरदृष्टी अशा अनेक उपक्रमांचे नेतृत्व केले.

## सूक्ष्मवित्त क्षेत्रात सिडबी

मायक्रोफायनान्स चळवळीला पाठींबा देत समावेशक वित्तविषयक कार्यावली पुढे नेण्यासाठी सिडबीने अग्रणी भूमिका बजावली आहे. बँकेच्या सूक्ष्मवित्त उपक्रमांतर्गत 31 मार्च 2021 पर्यंत वितरित केलेली एकत्रित मदत ₹20,568 करोड आहे, ज्याचा लाभ सुमारे 4 कोटी घटकांना झाला. एमएफआयना वित्त पुरवठा आणि समन्यायी पाठबळ देण्यासह या संस्थांना क्षमता बांधणीचा आधार देऊन अनुपालन मूल्यांकनाच्या साधनांद्वारे कॉर्पोरेट संस्कृती आत्मसात करण्यात सिडबीची भूमिका अग्रणी राहीली आहे. मायक्रोफायनान्स उद्योगाच्या सुरवातीच्या नाजूक काळात हातात हात घेऊन तो पूर्णपणे विकसित उद्योग विभाग होण्यापर्यन्तचे पूरक समर्थन, आमच्या 8 भागीदार एमएफआयना एसएफबीज/ युनिव्हर्सल बँक्सचे संक्रमणात संचयन करणे. बाजारभावापेक्षा बऱ्यापैकी कमी व्याजदरात थेट सिडबी कडून (भागीदारी करारा द्वारे ) लघु कर्जांची उपलब्धता करण्याचा सूक्ष्म कर्ज पुरवठ्यातील पथदर्शी पुढाकार. 'प्रयास' या शीर्षकांतर्गत पिरॅमिडच्या पायथ्याशी असणाऱ्या सूक्ष्म ऋणकोंसाठी बाजारभावापेक्षा तुलनेने कमी व्याजदरात भागीदारी मॉडेल अंतर्गत ₹0.5 लाख ते ₹ 5 लाख पर्यन्तच्या लघु तिकीट आकाराच्या कर्जांचा विस्तार सिडबीबँक करत आहे.

## इक्विफॅक्स बद्दल

इक्विफॅक्स ही एक ग्लोबल इन्फॉर्मेशन सोल्युशन्स कंपनी आहे. जी विश्वासार्ह, अद्वितीय माहीतीचा वापर सृजनशील पृथक्करणात, तंत्रज्ञान आणि उद्योग कौशल्याचा उपयोग जगातील व्यक्ती व संस्थांना ज्ञानाचे अंतरदृष्टीत रुपांतर करून देण्यात करते. जे वैयक्तिक निर्णयात आणि माहितीपूर्ण व्यवसायात मदत करतात.

अटलांटा (जॉर्जिया, यूएसए) येथे मुख्यालय असलेली इक्विफॅक्स ही उत्तर अमेरिका, मध्य व दक्षिण अमेरिका, युरोप व आशिया पॅसिफिक विभागातील 24 देशांमध्ये गुंतवणूक व संचालन करते. स्टँडर्ड आणि पुअर (एस अँड पी) 500® निर्देशांकाची इक्विफॅक्स सदस्य असून तिच्या सामान्य भागांची (कॉमन स्टॉक( न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंज (एनवायएसइ) वर EFX या चिन्हाखाली देवाणघेवाण होते इक्विफॅक्सचे . जगभरात 11,000 कर्मचारी आहेत. पत उद्योगातील 120 वर्षांच्या जागतिक अनुभवाच्या वारश्यासह इक्विफॅक्स ने भारतीय बाजारात 2010 मध्ये आपली उपस्थिती प्रस्थापित केली आणि रिझर्व्ह बँकेने CIC म्हणून काम करण्याचा परवाना दिला गत . 9 वर्षात क्रेडीट ब्युरोमधे बँकाएनबीएफसी ,, एमएफआय आणि विमाकारांच्या समावेशासह 4000+ सदस्यांसह वाढ झाली. हे सदस्य लक्षावधी भारतीय ग्राहकांची जनसंख्या आधारीत आणि परतफेडीची माहीती प्रदान करतात. इक्विफॅक्सने 2014 मध्ये एका विश्लेषक व्यवसाय संस्थेच्या अधिग्रहणातून भारतातील आपल्या पाऊलखुणा अधिकच घट्ट केल्या. इक्विफॅक्स ॲनालिटिक्स प्रालिमिटेड . ही इक्विफॅक्सच्या संपूर्ण मालकीची विश्लेषक संस्था आहे, जी अद्वितीय सानुकूलित विश्लेषणात्मक उपाय प्रदान करते जे व्यवसायांची कार्यक्षमता आणि ग्राहकांचे जीवन या दोघांना समृद्ध करते.

### अस्वीकरण

मायक्रोफायनान्स पल्स (अहवाल) इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड (इक्विफॅक्स) द्वारा तयार करण्यात आले. या अहवालाच्या वापराद्वारे वापरकर्ता या अस्वीकाराणच्या आधीन राहून त्याची स्वीकृती देतो. इक्विफॅक्सचे जे सभासद आहेत त्या मायक्रोफायनान्स संस्थांच्या मार्च 2021 च्या पर्याप्त माहीती प्रदानावर आणि त्या माहीतीच्या सविस्तर तौलकनि प्रक्रियेवर आधारीत हा अहवाल आहे. इक्विफॅक्स अहवाल तयार करताना पुरेशी काळजी घेत असते. परंतु मायक्रोफायनान्स संस्थांनी सदर केलेल्या अयोग्य व चुकीच्या माहीतीमुळे अहवालात उद्भवत असलेल्या चुकांबाबत त्रुटींबाबत/ इक्विफॅक्स उत्तरदायी असू शकत नाही. शिवायइक्विफॅक्स अहवालातील , माहीतीच्या पूर्णतेची किंवा पर्याप्ततेची आणि/ किंवा कुठल्याही विशिष्ट उद्देशासाठी त्याच्या उपयुक्ततेची हमी देत नाही. किंवा, अहवालाच्या कुठल्याही उपयोगासाठी इक्विफॅक्स उत्तरदायी नाही आणि इक्विफॅक्स अशा सर्व उत्तरदाकयत्वाचा स्पष्टपणे अस्वीकार करतेअस्वीकृती अथवा स्वीकृतीची अनुशंसा /परिणामाच्या नकार /उत्पादन,हा अहवाल कुठल्याही उपयोजन . करत नाही किंवा इक्विफॅक्स i)कर्ज देणे वा न देणे ii) व्यक्ती संबंधित/ संस्था संबंधित कुठल्याही आर्थिक व्यवहारात उतरणे वा न उतरण्याची अनुशंसाही करत नाही. या अहवालातील माहीती कुठल्याही प्रकारचा सल्ला स्थापित करत नाही आणि या अहवालातील माहीतीच्या आधारे कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यापूर्वी वापरकर्त्याने त्याच्या मते योग्य असणारे सर्व आवश्यक विश्लेषण केले पाहीजे. या अहवालाचा वापर क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज 2005 कायदा (नियंत्रण), क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रेग्युलेशन 2006, क्रेडीट इन्फॉर्मेशन कंपनीज रूल्स ,2006 मधील तरतुदी द्वारा नियंत्रित केला जातोपूर्व . परवानगी शिवाय या अहवालाच्या कुठल्याही भागाच्या प्रती तयार, वितरित वा प्रकाशित करू नये.

इंग्रजीतून मराठीत केलेल्या भाषांतरात काही अस्पष्टता .संदर्भ ग्राह्य धरला जाईल / इंग्रजीतील संबंधित मजकूर ,तफावत आढळल्यास /

## संपर्क तपशील

**इक्विफॅक्स क्रेडीट इन्फॉर्मेशन सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड**
यूनिट क्र. 931, 3 रा मजला, बिल्डिंग/ इमारत क्र. 9,
सॉलीटेअर कॉर्पोरेट पार्क , अंधेरी घाटकोपर लिंक रोड ,
अंधेरी (पूर्व), मुंबई - 400 093

टोलफ्री क्र.: 1800 2093247
ecissupport@equifax.com

**भारतीय लघुउद्योग विकास बँक (सिडबी)**
स्वावलंबन भवन, प्लॉट नं. सी-11, 'जी' ब्लॉक,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व ),
मुंबई - 400 051 महाराष्ट्र

टोलफ्री क्र.: 1800 226753
www.sidbi.in/en

**प्रकाशन अधिकार ® 2022 इक्विफॅक्स इंकॉ**